# नीतिमत्ता संहिता

ईटन बंधनकारक करते की ईटन, तिच्या उपकंपन्या आणि सहयोगी कंपन्यांचे ("ईटन") सर्व संचालक, अधिकारी आणि कर्मचारी त्यांचे काम करताना येथे दिलेल्या नैतिक वर्तनाबाबतच्या मूलभूत तत्वांचे पालन करतील.

1. **कायद्याचे पालन** - आमच्या जगभर पसरलेल्या व्यवसायाचे नियम व कायद्याचे सन्मान व पालन केले जाईल.

2. **कंपनिच्या आर्थिक निकालांचे व्यवस्थित व प्रामाणिकपणे नोंदणी आणि प्रस्तुतीकरण** - आम्ही कंपनीची सर्व प्रकारचे आर्थिक व इतर माहिती प्रामाणिकपणे, वेळबद्ध, अचूक व न्याय्य रीतीने नोंदवतो व जाहिर करतो. आम्ही एक अंतर्गत नियंत्रण व्यवस्था विकसित केलेली आहे जी आमच्या नोंदी व माहितीची सत्यता कायम राखण्यासाठी तयार केलेली आहे.

3. **मानवीय अधिकारांचा सन्मान** - आम्ही मानवीय अधिकारांचा सन्मान करतो व माल पुरवठा करणाऱ्यांकडून पण तशीच अपेक्षा करतो.

4. **उत्तम प्रतीचे उत्पादन** - आमचे ध्येय उत्कृष्ट उत्पादन आणि सेवा पुरवणे हेच आहे.

5. **नैतिक स्पर्धाशीलता** - आमच्या सर्वोत्कृष्ट कृतीमुळेच आम्हाला प्रतिस्पर्धेचा फायदा होतो. आम्ही गैरकायदेशीर किंवा अनैतिक व्यवहारात विश्वास ठेवत नाही.

6. **वैविध्य व उत्तम कर्मचारी पद्धतीचा आदर** - आम्ही अशा पद्धतींद्वारे सांस्कृतिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण कर्मचारीवर्गाचा आदर करण्यास वचनबद्ध आहोत की ज्या सर्व कर्मचाऱ्यांना पात्रतेच्या आधारे समान संपर्क आणि समान वागणुक देतात. कामाच्या ठिकाणी कोणाचाही छळ किंवा भेदभाव केला जात नाही.

7. **परस्परविरोधी हितसंबंध टाळणे** - जे संबंध किंवा आचरणे आमच्या निर्णयशक्तीवर परिणाम करु शकतील किंवा आमचे वैयक्तिक हितसंबंध व ईटनशी निष्ठा यांमध्ये प्रत्यक्ष वा भासमान परस्परविरोध निर्माण करु शकतील, ते आम्ही टाळतो. कंपनीतील आमच्या

स्थानाचा गैरवापर स्वतःच्या किंवा इतरांच्या फायद्यासाठी आम्ही करत नाही. ईटनशी स्पर्धा करणाऱ्या कृती किंवा संबंधांमध्ये आम्ही गुंतत नाही.

8. **मालमत्ता आणी माहितीचे रक्षण करणे** - आम्ही ईटनच्या मालमता, माहिती, व संधी फक्त ईटनच्या व्यवसायासाठी वापरतो, अनधिकृत वापरासाठी नाही. आमहाला ईटन व इतरांनी दिलेल्या माहितीची व कर्मचारीविषयक आकडेवारीची गोपनीयता आम्ही योग्य रीतीने सांभाळतो.

9. **सचोटीने वर्तन करणे** - आम्ही कोणत्याही प्रकारची लाच कुठल्याही स्वरुपात देऊ करत नाही व स्वीकारत नाही. आम्ही आमची नीतिमत्ता व मूल्यांशी सुसंगत असणाऱ्या व्यावसायिक कार्यपद्धती वापरतो.

10. **शासनाला विकणे** - शासनाच्या कुठल्याही व्यक्ती किंवा विभागाशी व्यवहार करतेवेळी, कायद्या व नियमांचे तंतोतंत पालन करतो.

11. **राजनैतिक हातभार** - जरी कायदेशीर असले तरी आम्ही कुठल्याही राजनेता किंवा गटाला ईटनच्या वतीने हातभार लावत नाही.

12. **पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा** - आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांचे आरोग्य व सुरक्षेचे रक्षण करण्याच्या आणि पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या बाबतीत जागतिक स्तरावर अग्रगण्य होण्यास वचनबद्ध आहोत.

**खबर देणे** - स्थानिक कायद्याच्या आधीन, कुठलीही व्यक्ती उघडपणे किंवा निनावीरीत्या, कायद्याचे किंवा आर्थिक नियमांचे उल्लंघन झाल्यास त्याची नोंद नीतिमत्ता आणि अनुपालन कार्यालयाकडे करु शकते. या उल्लंघनात जमाखर्च, हिशोबतपासणी, करसंबंधी किंवा नोंदणी, बदलाचे फसवणुकीचा देखील समावेश आहे. नोंद निनावी रीत्या न केल्यास त्या व्यक्तीची ओळख पुरेशी तपासणी होईपर्यंत गोपनीय ठेवण्यात येईल.

या खबरा खाली दिल्यानुसार टपालाने, ई-मेलने किंवा दूरध्वनीद्वारा देता येतील:

**टपालाने पत्रव्यवहार -**

पत्रव्यवहार :
SVP, Ethics and compliance
Eaton
1000 Eaton Boulevard
Cleveland, OH 44122 USA

**ई-मेल**

ई-मेल Ethics@eaton.com येथे पाठवा किंवा JOE (ईटनचे अंतर्गत नेट) मार्फत प्रवेश असलेल्या जागतिक नीतिमत्ता संकेतस्थळावरील, किंवा ईटनच्या बहिस्थ संकेतस्थळावरील वेब फॉर्म्स वापरा.

**दूरध्वनी**

नीतिमत्ता व आर्थिक सचोटी हेल्प लाईनशी अमेरिका किंवा कॅनडामधून 800.433.2774 वर डायल करुन संपर्क साधा. इतर सर्व देशांसाठी, आपल्या स्थानिक नीतिमत्ताविषयक पोस्टरवर दिल्लेया किंवा JOE वरील जागतिक नीतिमत्ता संकेतस्थळावर दिलेल्या क्रमांकावर डायल करा. ही हेल्प लाईन विनामूल्य असून एक बहुभाषीय प्रतिनिधी दिवसाचे 24 तास आठवड्याचे 7 दिवस उपलब्ध असतो.

**बहुभाषीय सहाय्त -**

आपल्याला हवे असल्यास आपण यापैकी एका पत्त्यावर आपली शंका लिहून कळविण्यासाठी आपली मूळ भाषा वापरु शकता, आणी आम्ही आपल्या पत्राचे किंवा ई-मेलचे भाषांतर करु.

नैतिकता, कायदा किंवा आर्थिक शंका कळविणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्याविरुद्ध बदला घेण्यास ईटन परवानगी देणार नाही, तसेच कोणत्याही कर्मचाऱ्याने केवळ हाती असलेल्या माहितीवरून खबर दिल्यास त्याच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करणार नाही.

**वैयक्तिक जबाबदारी**

ईटनच्या नीतिमत्ताविषयक आचारसंहितेमध्ये दिलेल्या तत्वांचे वाचन, माहिती करुन घेणे आणि अनुपालन करणे ही प्रत्येक संचालक, अधिकारी आणि कर्मचाऱ्याची वैयक्यिक जबाबदारी आहे.

स्थानिक कायद्याच्या आधीन, या तत्वांचे अनुपालन ही नोकरीसाठीची एक अट आहे, आणि अनुपालन न केल्यास शिस्तभंगाची कारवाई केली जाऊ शकते, ज्यामध्ये नोकरीमधून काढून टाकणेही अंतर्भूत आहे.

नीतिमत्ता संहितेचा भंग झाल्यास संचालक मंडळ त्याविरुद्ध करण्याच्या कृती ठरवेल किंवा त्या ठरवण्यासाठी व्यवस्थापनातील योग्य व्यक्तींना नियुक्त करेल. या कृती गैरवर्तनांना मर्यादा घालण्याच्या आणी नीतिमत्ता संहितेच्या पालनासाठी जबाबदारीला उत्तेजन देण्याच्या उद्देशाने योग्य तशा तयार केल्या जातील.

स्थानिक कायद्याच्या आधीन, अशा कोणत्याही कृती ईटनच्या नजरेस आणून देण्याचे प्रत्येक संचालक, अधिकारी किंवा कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे, की ज्या त्यांच्या मते या तत्वांचा भंग करतील. यासाठीच्या खबरा एकाद्या पर्यवेक्षकाला किंवा व्यवस्थापनाच्या दुसऱ्या सदस्याला, किंवा वर दिलेल्या नीतिमत्ता आणि अनुपालन कार्यालयाला द्याव्या. संभाव्य भंगसुद्धा संचालक मंडळाच्या लेखापरीक्षण किंवा शासन समित्यांच्या अध्यक्षांना, किंवा थेट संपूर्ण संचालक मंडळाला पत्रव्यवहाराने वरिष्ठ उपाध्यक्ष, नीतिमत्ता आणि अनुपालन यांच्या द्वारा कळवता येतील, जे तो अहवाल पुढे पाठवतील.